# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः31.08.2024** **वारःशनिवार**

---

1. वाढवण बंदरासह विविध विकास कामांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्रारंभ
2. वाढवण बंदरामुळे पालघर परिसराचं आर्थिक चित्र बदलेल-पंतप्रधानांचा विश्वास
3. राजकोटमधील पुतळा दुर्घटनेप्रकरणी पंतप्रधांकडून दिलगिरी व्यक्त
4. आर्थिक सेवांच्या सार्वत्रिकीकरणामध्ये फिनटेकची महत्त्वपूर्ण भूमिका-पंतप्रधानांचं प्रतिपादन आणि
5. पॅरीस पॅरालिम्पिकमध्ये भारतीय नेमबाज अवनी लेखराची सुवर्ण पदकाला गवसणी

**पंतप्रधान वाढवण**

वाढवण बंदरामुळे पालघर परिसराचं आर्थिक चित्र बदलणार असून वाढवण बंदराच्या पायाभरणीचा दिवस हा देशाच्या प्रगतीच्या वाटचालीतला ऐतिहासिक दिवस आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. पालघर जिल्ह्यातल्या वाढवण बंदराच्या पायाभरणीसह अन्य विकासकामांचं उद्घाटन आणि भूमीपूजन काल पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या पुतळा दुर्घटनेबाबत खेद व्यक्त केला आणि शिवरायांची तसंच शिवभक्तांची माफी मागितली.

गेल्या दशकात देशाच्या किनारपट्टीवरील भागाच्या विकासानं अभूतपूर्व गती घेतली आहे असं मोदी यांनी सांगितलं. आज सगळं जग वाढवण बंदराकडे अपेक्षेनं पाहात असल्याचं सांगत पंतप्रधान म्हणाले.....

या कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते स्थानिक मासेमारांना बोटीवर लावण्याच्या ट्रान्स्पाँडर अर्थात संपर्क व्यवस्था साधनांचं वितरण करण्यात आलं. इस्रोनं विकसित केलेले हे ट्रान्स्पाँडर देशातल्या 1 लाख बोटींवर लावले जाणार आहेत. यावेळी मोदींच्या हस्ते काही मच्छीमारांना किसान क्रेडिट कार्डचंही वाटप करण्यात आलं. या कार्यक्रमाला केंद्रिय जहाजबांधणी, बंदर आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य मंत्री आणि मान्यवर उपस्थित होते. वाढवण बंदर राज्यासाठी प्रगतीचं नवं शिखर ठरेल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. तर वाढवण बंदरामुळे आत्मनिर्भर आणि विकसित भारतात महाराष्ट्राची भूमिका आणखी भक्कम होईल, असं केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी सांगितलं.

**पंतप्रधान फिनटेक**

भारताच्या वित्तीय तंत्रज्ञान क्षेत्रामुळे जगभरातल्या लोकांची जीवनपद्धती सुलभ होणार असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. जागतिक वित्तीय तंत्रज्ञान अर्थात फिनटेक महोत्सवात ते काल मुंबईत बोलत होते. भारतानं ज्या गतीनं आणि ज्या प्रमाणात वित्त क्षेत्रातलं तंत्रज्ञान अंगीकारलं आहे त्याला जगात तोड नाही. जगातले निम्म्यापेक्षा जास्त तत्काळ होणारे डिजिटल अर्थव्यवहार भारतात होतात असं पंतप्रधान म्हणाले. आर्थिक सेवांचं सार्वत्रिकीकरण होण्यात फिनटेकनं महत्त्वाची भूमिका बजावली आहे. डिजिटल व्यवहारांमुळे आर्थिक व्यवहारांमधली

पारदर्शकता वाढली आणि समांतर अर्थव्यवस्थेला खीळ बसली. फिनटेकनं आर्थिक व्यवहारांमध्ये आणलेले बदल केवळ तंत्रज्ञानापुरते मर्यादित नाहीत. त्यांचा सामाजिक परिणाम खूप व्यापक आहे असं पंतप्रधान मोदी यांनी सांगितलं. फिनटेक क्षेत्रातल्या अत्याधुनिक कल्पनांची माहिती देणाऱ्या प्रदर्शनालाही यावेळी मोदी यांनी भेट दिली.

**नाशिक शिवसृष्टी-नाशिक**

नाशिक जिल्ह्यातील नांदगाव इथं उभारण्यात येत असलेल्या शिवसृष्टीच्या पहिल्या टप्प्याचं लोकार्पण काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालं. राजकोट इथं राज्य शासन आणि नौदलाच्या वतीनं युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा लवकरच उभारण्यात येईल; तसंच नांदगावच्या शिवसृष्टीसाठी लागणारा निधी उपलब्ध करून दिला जाईल, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. नांदगाव नगरपालिकेच्या इमारतीसाठी १० कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाईल असंही त्यांनी सांगितलं.

**शिवाजी महाराज परिषद**

सोन्याचा नांगर फिरवत छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. शेतकऱ्यांना कसण्यासाठी जमीन, कर्ज आणि मोफत बियाणं देणारे छत्रपती शिवाजी महाराज हे एकप्रकारे देशातल्या पहिल्या कृषी क्रांतीचे जनक होते, असं मत माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे यांनी व्यक्त केलं. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन आणि कार्याचं 21 व्या शतकातील महत्त्व आणि समयोचितता याविषयी राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजांना सुराज्य, सुशासन, समृद्धी, राष्ट्रकल्याण आणि लोककल्याणकर्ता राजा म्हणून अभ्यासायाल हवं असं महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यावेळी म्हणाले. परिषदेच्या उद्घाटनाला राष्ट्रीय परिषदेचे बीजभाषक डॉक्टर सदानंद मोरे, कुलगुरू डॉक्टर सुरेश गोसावी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यापीठाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विशेष टपाल तिकिटाचं प्रकाशन करण्यात आलं.

**नदीजोड-नाशिक**

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यासाठी वरदान ठरणाऱ्या दमणगंगा-अप्पर वैतरणा-कडवा-देवलिंग या नदीजोड प्रकल्पाला जलसंपदा विभागाच्या तांत्रिक सल्लागार समितीने नुकतीच मान्यता दिली आहे. पुढच्या कार्यवाहीसाठी हा प्रस्ताव गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडे पाठवला असून त्यानंतर अंतिम मान्यतेसाठी हा प्रस्ताव लवकरच शासनाकडे पाठवला जाईल, अशी माहिती नाशिकचे माजी खासदार हेमंत गोडसे यांनी काल दिली.

**वनौषधी-सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्गातील जंगलातल्या वनौषधींचं सर्वेक्षण करायला सांगितलं असून दोडामार्ग तालुक्यात औषधांचे कारखाने सुरू करण्यात येणार आहेत अशी माहिती खासदार नारायण राणे यांनी दिली. ते काल सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ इथं बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तुंच्या प्रदर्शन आणि खरेदी महोत्सवाचं उद्घाटन झालं.

**स्वामी स्वरूपानंद-रत्नागिरी**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या पावसमधल्या स्वामी स्वरूपानंदांच्या पन्नासाव्या पुण्यतिथीनिमित्त काल त्यांच्या 'मृत्युपत्र' या महाकाव्याचं प्रकाशन अयोध्येच्या श्रीरामजन्मभूमी विश्वस्त संस्थेचे कोषाध्यक्ष गोविंददेवगिरी महाराज यांच्या हस्ते झालं. स्वामी स्वरूपानंदांच्या 'अमृतानुभव' या पुस्तकाच्या वासुदेव जोशी यांनी केलेल्या इंग्रजी अनुवादाचं प्रकाशनही

यावेळी झालं. या कार्यक्रमाला गोव्याचे मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत, तसंच रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत आदी मान्यवर उपस्थित होते.

**दूध अनुदान**

पुण्यासह राज्यभरातल्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर आठवडाभरात दूध अनुदान जमा होईल अशी माहिती पुणे दुग्धविकास आयुक्त प्रशांत मोहोड यांनी दिली आहे. राज्यातल्या सर्व दूध संघांनी शेतकऱ्यांची माहिती संकेतस्थळावर तत्काळ भरावी. राज्य सरकारकडून 256 कोटी रुपये दुग्धविकास विभागाकडे वर्ग झाले आहेत. कागदोपत्री तयारी पूर्ण होताच दूध अनुदान थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल असं मोहोड यांनी सांगितले.

**निवृत्ती**

सिंधुदुर्गनगरी केंद्रात सहाय्यक संचालक म्हणून कार्यरत असलेले श्रीपाद कहाळेकर 35 वर्षाच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. आरंभी सांगली आणि नंतर कोल्हापूर आकाशवाणी केंद्रांवर कार्यक्रम निर्मिती करताना त्यांनी शेती आणि ग्रामीण विकासाच्या दृष्टीनं अतिशय दर्जेदार कार्यक्रम प्रसारित केले आणि आकाशवाणीची लोकप्रियता सर्वदूर पसरविण्यात मोलाचं योगदान दिलं. सिंधुदुर्गनगरी इथं उपमहानिदेशक अभियांत्रिकी आणि गोवा क्लस्टर प्रमुख सुनील भाटिया यांच्या उपस्थितीत श्रीपाद कहाळेकर यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

**पॅरालिम्पिक**

पॅरीसमध्ये सुरू असलेल्या पॅरालिम्पिक क्रीडा स्पर्धेत भारतीय नेमबाज अवनी लेखरा हिनं 10 मीटर एअर रायफल प्रकारात विक्रमी 249 पूर्णांक 7 दशांश गुणांची कमाई करत सुवर्णपदक पटकावलं. याच स्पर्धेत मोना अगरवालनं कास्य पदक मिळवलं. शंभर मीटर धावण्याच्या टी 35 स्पर्धेत भारताच्या प्रीती पाल हिनं कास्य पदक मिळवलं. बॅडमिंटनपटू सुहास यतीराजनं पुरुष एकेरीच्या एसएल 4 श्रेणीत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. तर नितेश कुमार एस एल 3 श्रेणीत उपांत्य फेरीसाठी पात्र ठरला आहे. नेमबाज मनिष नरवाल पुरुषांच्या 10 मीटर एअर पिस्टल स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचला आहे.

**पाणी विसर्ग-धुळे**

धुळे जिल्ह्यातल्या अक्कलपाडा प्रकल्पासह वाडी शेवाडी मध्यम प्रकल्पातूनही मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. त्यामुळे बुराई नदी काठच्या नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी असा इशारा प्रशासनानं दिला आहे.

**हवामान**

कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.